# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः02.04.2024** **वारःमंगळवार**

---

1.कोळशाचं उत्पादन एक अब्ज टनांपर्यंत जाणं हा भारतासाठी ऐतिहासिक टप्पा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.

2.सरत्या आर्थिक वर्षात संरक्षण क्षेत्रातील निर्यातीनं 21 हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला

3.सीमेवरील तणाव कमी होत नाही तोपर्यंत पाकिस्तानबरोबर व्यापाराची शक्यता नसल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांचं स्पष्टीकरण

4.देशभरात निवडणूक प्रचाराला जोर. पंतप्रधानांच्या आज उत्तराखंड आणि राजस्थानात सभा.

आणि

5.जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीनंतर मीराबाई चानू हीचं पॅरिस ऑलिंपिकमधलं स्थान निश्चित

**<u>कोळसा उत्पादन</u>**

कोळसा आणि दगडी कोळशाचं उत्पादन एक अब्ज टनांपर्यंत जाणं हा भारतासाठी ऐतिहासिक टप्पा असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. कोळसा क्षेत्राबाबत सरकारची कटिबद्धता त्यातून अधोरेखित होते असंही ते म्हणाले. या संदर्भात समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात मोदी यांनी कोळशाचं उत्पादन एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढणं ही विलक्षण कामगिरी असल्याचं म्हटलं आहे. भारताचा आत्मनिर्भर बनण्याबाबतचा प्रवास योग्य दिशेनं होण्याची खातरजमा त्यामुळे होते, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

कोळसा आणि दगडी कोळशाचं उत्पादन देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एक अब्ज टनांपेक्षा पुढे गेल्याचं कोळसामंत्री प्रल्हाद जोशी यांनी नमूद केलं आहे. सरकारच्या योग्य धोरणांमुळे गेल्या दहा वर्षांमध्ये कोळसा आणि दगडी कोळशाच्या उत्पादनात सत्तर टक्क्यांनी वाढ झाली आहे, असं ते म्हणाले.

**<u>संरक्षण निर्यात</u>**

दरम्यान, देशातील संरक्षण क्षेत्रातील निर्यात 2023-24 या आर्थिक वर्षात 21 हजार कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी समाजमाध्यमांवर याबाबत माहिती दिली आहे. गेल्या आर्थिक वर्षात संरक्षण क्षेत्रातील निर्यातीत 32 टक्के वाढ झाल्याचं त्यांनी नमूद केलं. या क्षेत्रातील उत्पादन आणि निर्यात वाढावी यासाठी संरक्षण मंत्रालयानं अनेक पाऊलं उचलली असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

पाकिस्तान

सीमेवरील तणाव कमी होत नाही तोपर्यंत पाकिस्तानबरोबर व्यापाराची शक्यता नाही असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल स्पष्ट केलं. सुरतमध्ये दक्षिण गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीतर्फे आयोजित परिषदेत ते बोलत होते. कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही, असं ते म्हणाले.

अरुणाचल प्रदेशबाबतचा चीनचा दावा जयशंकर यांनी फेटाळून लावला. अरुणाचल प्रदेश हे भारतातील राज्य असून, ते कायम भारतातलंच राज्य राहील आणि नाव बदलल्यामुळे या वस्तुस्थितीत बदल होणार नाही, असं ते म्हणाले. चीनशी मुकाबला करण्यासाठी भारतानं उत्पादनावर भर दिला पाहिजे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

दरम्यान, अरुणाचल प्रदेशमधील तीस ठिकाणांना चीननं बेकायदा पद्धतीनं दिलेल्या नवीन नावांचा केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी निषेध केला आहे. चीन सगळ्या प्रकारचे निराधार दावे करत असला, तरी त्यामुळे वस्तुस्थिती आणि ऐतिहासिक तथ्य बदलू शकत नाही, असं रिजिजू यांनी समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

**<u>राजस्थान/उत्तराखंड</u>**

देशभरात ठिकठिकाणी निवडणूक प्रचाराला जोर आला आहे. विविध पक्षांतर्फे उमेदवार जाहीर केले जात असून शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरले जात आहेत.

पंतप्रधान आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज राजस्थानमध्ये जयपूर ग्रामीण लोकसभा मतदारसंघांतर्गत कोटपुतली इथं निवडणूक रॅलीला संबोधित करणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर राजस्थानमध्ये पंतप्रधानांची ही पहिलीच सभा असेल. राजस्थानमध्ये 19 एप्रिल आणि 26 एप्रिलला दोन टप्प्यात लोकसभा निवडणुका होणार आहेत. याशिवाय उत्तराखंडमधील नैनिताल उधमसिंह नगर लोकसभा मतदारसंघातील रुद्रपूरमध्येही पंतप्रधान मोदी  आज निवडणूक रॅलीला संबोधित करणारआहेत. या मतदारसंघातून भाजपचे उमेदवार अजय भट्ट हे  काँग्रेसचे उमेदवार प्रकाश जोशी यांच्या विरोधात लढत आहेत. उत्तराखंड राज्यातील लोकसभेच्या पाचही जागांसाठी पहिल्या टप्प्यात 19 एप्रिलला मतदान होणार आहे.

**<u>निवडणूक</u>**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज कर्नाटकच्या एका दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. ते बंगळुरूमध्ये पाच लोकसभा मतदारसंघातील पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत आणि नंतर बंगळुरू ग्रामीण लोकसभा मतदारसंघाचा भाग असलेल्या चन्नापटना इथं रोड शो करणार आहेत.

दुसरीकडं, लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची काल नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीला पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आदी उपस्थित होते. त्यांनी आगामी लोकसभा

निवडणुकीसाठी दोन उमेदवारांची यादी जाहीर केली. यामध्ये अभय पाटील यांना महाराष्ट्रातील अकोला लोकसभा मतदारसंघातून तर कडियाम काव्या यांना तेलंगणातील वारंगल मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

**दोन हजार रुपयांच्या नोटा**

दोन हजार रुपयांच्या सुमारे 98 टक्के नोटा परत आल्याचं रिझर्व्ह बँकेनं स्पष्ट केलं आहे. 29 मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात दोन हजारांच्या 8 हजार 202 कोटी रुपयांच्या नोटा चलनात आहेत; मे 2023मध्ये हीच संख्या तीन लाख 56 हजार कोटी रुपये होती, असं रिझर्व्ह बँकेनं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं गेल्या वर्षी 19 मे रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत दोन हजार रुपयांच्या नोटा परत घेत असल्याची घोषणा केली होती आणि नागरिकांनी आपल्याकडच्या नोटा कोणत्याही बँकेत जमा करण्याची सूचना केली होती.

**राजस्थान-गगनशक्ती**

राजस्थानमधल्या जैसलमेर जिल्ह्यातील पोखरण इथं भारतीय हवाई दलाचा 'गगन शक्ती' हा सर्वात मोठा युद्धसराव सुरू झाला आहे. कालपासून सुरू झालेला हा सराव 10 एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये हवाई दलाची सर्व प्रमुख लढाऊ विमानं आणि आधुनिक हेलिकॉप्टर्स सहभागी होत आहेत. पोखरणसह देशभरात विविध ठिकाणी हा सराव केला जात असून तेजस, राफेल, सुखोई ३०, जग्वार, ग्लोबमास्टर, चिनूक, अपाचे आणि प्रचंड यासह अनेक लढाऊ विमानं आणि हेलिकॉप्टर या सरावात सहभागी होतील.

**सिरीया हल्ले**

सिरीयातील इराणच्या दूतावासाच्या परिसरातील राजनैतिक विभागाच्या इमारतीवर काल हवाई हल्ले करण्यात आले. इस्राईलनं हे हल्ले केल्याचा आरोप सिरीयानं केला, मात्र इस्राईलनं कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. या हल्ल्यात इराणचे लष्करी सल्लागार जनरल अली रजा झैदी मारले गेले, असं सिरीयानं म्हटलं आहे. या हल्ल्यात राजनैतिक विभागाची इमारत भुईसपाट झाली असली, तरी दूतावासाच्या मुख्य इमारतीवर काही परिणाम झाला नसल्याचं स्थानिक माध्यमांनी म्हटलं आहे. झैदी यांच्यासह सात जणांचा या हल्ल्यात मृत्यू झाल्याचं इराणचे राजदूत हुसेन अकबरी यांनी म्हटलं असून, या हल्ल्यांचा बदला त्याच प्रकारे घेतला जाईल, असा इशारा दिला आहे.

**रशिया खाण मृत्यू**

रशियातील सोन्याच्या खाणीत अडकून पडलेल्या तेरा कामगारांचा मृत्यू झाल्याचं रशियानं म्हटलं आहे. अमूर भागात दरड कोसळल्यामुळे दोन आठवड्यांपूर्वी तेरा कामगार अडकून पडले होते. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर शोध मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, त्यात यश आलं नाही, तसंच शोधमोहीम राबवणाऱ्यांच्याही जिवाला धोका निर्माण होत असल्यामुळे शोध मोहीम थांबवण्यात आल्याचं रशियानं जाहीर केलं आहे. त्या भागात आणखी दरडी कोसळून असे अपघात होऊ नयेत यासाठी तज्ज्ञांकडून उपाययोजना सुरू आहेत.

**<u>जपान-भूकंप</u>**

जपानमध्ये काल रात्री इवाते प्रीफेक्चरच्या उत्तरेकडील किनारपट्टीला 6 पूर्णांक 1 रिखटर स्केल इतक्या तीव्रतेच्या भूकंपाचा धक्का बसला.भारतीय प्रमाण वेळेनुसार काल मध्यरात्री
एकच्या सुमारास हा भूकंप झाला.दरम्यान,या भूकंपामुळं कोणतंही नुकसान झाल्याचं वृत्त नसून त्सुनामीबद्दलचाही कोणताही इशारा जपानच्या हवामान विभागानं जारी केलेला नाही.

**<u>शेअरबाजार</u>**

नव्या आर्थिक वर्षाची सुरूवात देशातल्या शेअर बाजारात काल तेजीत झाली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३६३ अंकांची वाढ नोंदवत ७४ हजार १५ अंकांवर, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २२ हजार ४६२ अंकांवर बंद झाला.

**<u>मीराबाई-एनओए-माधवी</u>**

टोकियो ऑलिंपिक स्पर्धेत पदक मिळवणारी भारताच्या मीराबाई चानू हीनं पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेसाठी पात्र ठरलेली ती पहिली भारोत्तोलक आहे. थायलंडमध्ये झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत मिळवलेल्या यशामुळे मीराबाई चानू पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरली. या स्पर्धेत ब गटात महिलांच्या 49 किलो वजनी गटात मीराबाईनं 184 किलो वजन उचलत तिसरं स्थान पटकावलं आहे.

**<u>उन्हाळा-पूल-माधवी</u>**

यंदाच्या उन्हाळ्यात देशाच्या विविध भागात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. एप्रिल ते जूनच्या कालावधीत महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान आणि कर्नाटकच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी काल सांगितलं. देशाच्या अन्य भागांसह मध्य महाराष्ट्रात उष्णतेची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.
दरम्यान, उष्णतेच्या लाटेच्या अंदाजामुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी काल विविध घटकांची बैठक घेऊन आढावा घेतला.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**